**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,**
**शिवाजीनगर पुणे-४११ ००५.**
जा.क्र.कृआ-२०१५/कं.मान्यता/फलो-४/६२६/२०१५
दिनांक :१८ जून, २०१५.

# आदेश

**विषय :- सन २०१५-१६ साठी ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्याच्या नवीन नोंदणीस /नोंदणी नुतनीकरणास मान्यता प्रदान करणेबाबत.**

**संदर्भ :-** १) कृषि व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई याचे पत्र क्र. सिसियो/२११५/प्र.क्र.१३३/४अे दि. २४/०४/२०१५.
२) राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान मार्गदर्शक सुचना मधील APPENDIX - IA मधील परिच्छेद क्र.१
३) जा.क्र.कृ.आ-२०१५/कं.मान्यता/फलो-४/५६७/२०१५, दिनांक ०१/०६/२०१५.

उपरोक्त संदर्भ क्र.३ च्या आदेशाव्दारे ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्यांच्या ५३ नवीन व ६ नुतणीकरण अशा एकुण ५९ ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्यांना मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

वर नमुद केलेल्या संदर्भ - १ मधील प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सोबत जोडलेल्या परिशिष्ट- १ व परिशिष्ट-२ मध्ये नमूद केलेल्या ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्यांच्या नवीन नोंदणी/नुतणीकरणास सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या जिल्यामध्ये सुक्ष्म सिंचनाची काम करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. या मध्ये १८ (अठरा) नवीन व ३ नूतनीकरण केलेल्या अशा एकुण २१ (एकवीस) ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्यांचा समावेश आहे.

१. सूक्ष्म सिंचन योजना अंमलबजावणीसाठी या आदेशान्वये ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्यांची करण्यात आलेली नोंदणी तीन वर्षासाठी वैध राहिल. मात्र सदरहू कंपन्यांनी प्रत्येक वर्षी कृषि आयुक्तालयाने विहित केलेले नोंदणी शुल्क भरुन नोंदणीचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे.

२. कृषि आयुक्तालयस्तरावर दि.१९/११/२०१४ रोजी सूक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपनी प्रतिनिधी सोबत झालेल्या बैठकीत कृषि आयुक्तालय व सूक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपनी यांच्यामध्ये करावयाचा अंतिम केलेल्या करारनाम्याच्या नमुन्यामध्ये रुपये १००/- च्या स्टॅम्पपेपरवर नोटराईज्ड करारनामा करून तो एक महिन्याच्या आत सुक्ष्म सिंचन उत्पादक कंपनीने आयुक्तालयास सादर करावा.

३. सोबतच्या यादीत नमूद केलेल्या ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्यांची सन २०१५-१६ साठी नोंदणी केलेली आहे त्या सर्व कंपन्यांनी प्रत्येकी रु. १,००,०००/- रक्कमेची बँक गॅरंटी रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर एक महिन्याच्या आत कृषि आयुक्तालयास सादर करावयाची आहे.

४. या आदेशान्वये नोंदणी केलेल्या कंपन्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रत्येक घटकांच्या बीआयएस मुदतीपर्यंत त्या कंपनीची नोंदणी/नुतनीकरण घटकनिहाय बीआयएसच्या मुदतीपर्यंत वैध राहिल. बीआयएस नुतनीकरणाची कागदपत्र विहित मुदतीत कृषि आयुक्तालयास सादर करण्याची जबाबदारी संबंधीत कंपनीची राहील.अशी कागदपत्रे वेळेत सादर न केल्यास त्या कंपनीची नोंदणी/नुतनीकरण घटकनिहाय बीआयएस मुदतीच्या अंतिम तारखेनंतर आपोआप रद्द होईल.

५. वरील प्रमाणे विहित घटकांच्या बीएसआय नोंदणीबाबतची/नुतनीकरणाची प्रमाणपत्रे संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सुध्दा वर नमूद केल्याप्रमाणे वेळेत सादर करणे संबंधीत कंपन्यांना बंधनकारक राहील.

६. नोंदणी/नुतणीकरणाच्या वेळी नोंदणीकृत कंपन्यानी सादर केलेल्या दरपत्रकातील दरापेक्षा जास्त दराने, कोणत्याही घटकांची विक्री करता येणार नाही. तसेच सदरचे दरपत्रक कृषि आयुक्तालयाच्या इ-ठिंबक आज्ञावलीवर नोंदणीवेळी नोंदणीकृत कंपन्यानी भरणे आवश्यक आहे. नोंदणीकृत कंपन्यांनी त्यांच्या दरपत्रकात त्या आर्थिक वर्षात वाढ किंवा घट केल्यास इ-ठिंबक आज्ञावलीवर भरणे व कृषि आयुक्तालयास त्वरित कळविणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

७. मार्गदर्शक सुचनामध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक जिल्हयात विक्रिपश्चात सेवा केंद्र उभारणी करणे व याबाबतची आवश्यक ती माहिती जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करुन त्यांची तपासणी करुन घेण्याची जबाबदारी संबधीत नोंदणीकृत कंपन्यांची राहील. नोंदणी प्राप्त होताच विक्रीपश्चात सेवा केंद्राची एक महिन्यात तपासणी करुन घेऊन त्याचा अहवाल कृषि आयुक्तालयास सादर करण्याच्या अटीच्या अधिन राहून सन २०१५-१६ साठी नोंदणी करण्यात येत आहे.

८. नोंदणीकृत कंपन्यानी मान्यता दिलेल्या प्रत्येक जिल्हयातील त्यांच्या वितरकांची यादी नोंदणीसाठी संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाकडे सादर करुन त्यांची नोंदणी करुन घेणे आवश्यक आहे.

९. सन २०१४-१५ च्या मार्गदर्शक सूचनामधील परिच्छेद-७ नुसार व त्यातील परिशिष्ट-१९ मधील विहीत नमुन्यात वितरकाने साठा नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सदरची नोंदवही सुक्ष्म सिंचन उत्पादक कंपनीच्या अधिकृत प्रतिनिधीनी व संबधीत तालुका कृषि अधिकारी यांनी संयुक्तरित्या प्रमाणित करणे बंधनकारक आहे. तसेच या मार्गदर्शक सूचनामधील परिच्छेद-७ (६) नुसार नोंदणीकृत कंपनीने उत्पादीत केलेल्या व वितरकांना पुरवठा केलेल्या सर्व घटकांचा घटक निहाय अहवाल दरमहा महिना संपताच पुढील माहिन्याच्या १० तारखेपर्यत कृषि आयुक्तालयास सादर करणे आवश्यक आहे.

१०. नोंदणीकृत कंपन्यांनी नियुक्त केलेल्या अधिकृत वितरक / विक्रेते, अधिकृत प्रतिनिधी यांनी अनियमितता अथवा शेतकरी, शासन इत्यादिची फसवणूक केल्यास त्या बाबीस वितरक / विक्रेत्या बरोबरच कंपनी प्रतिनिधी व कंपनीसुध्दा जबाबदार राहील.

११. सन २०१५-१६ या वर्षामध्ये केंद्र/राज्य शासन, कृषि आयुक्तालयस्तरावरुन वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सुचना,अटि व शर्ती इत्यादींचे पालन व त्यानुसार अंमलबजावणी करण्याची जबाबदारी नोंदणीकृत कंपन्यावर राहील.

१२. सन २०१५-१६ साठी तात्पुरत्या (Tentitive) स्वरुपातील मार्गदर्शक सुचना कृषि आयुक्ताल्याचे पत्र जा.क्र.कृ.आ./फलो-४/शेपाव्य/२०१५-१६/अंमासु/४५७/२०१५,दि.०८.०५.२०१५ अन्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्या तात्पुरत्या स्वरूपाच्या असून यापुढे केंद्र, राज्य शासन, कृषि आयुक्तालयस्तरावरुन वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या सुचना, अटि व शर्ती सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपन्या व त्यांच्या अधिकृत वितरकांवर बंधनकारक रहतील.

**सोबतः नोदणी/नुतनीकरणास मान्यता देण्यात आलेल्या ठिबक सिंचन संच उत्पादकांची यादी.**

(अ.क्र. ५४ ते ७१ = १८ नवीन नोंदणी, अ.क्र. ७ ते ९ = 3 नूतनीकरण)

**संचालक फलोत्पादन**

कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-५

प्रति,

मे. ----------------------

----------------------

प्रतिलिपी,

**१) विभागीय कृषि सहसंचालक, सर्व**

**२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (सर्व)**

**२/- यांना माहितीसाठी व पुढील प्रमाणे कार्यवाहीसाठी अग्रेषीत.**

१. सन २०१५-१६ या वर्षासाठी सुध्दा जिल्हास्तरावर संबधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांच्या जिल्हातील वितरकांची नोंदणी करणे बंधनकारक आहे. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी वितरक नोंदणीसाठी आवश्यक असलेले व कृषि आयुक्तालयाने विहित केलेले शुल्क रु.२७५०/- ( अक्षरी रु.दोन हजार सातशे पन्नास फक्त) भरुन घ्यावे. तसेच रु.१००००/- (अक्षरी रु. दहा हजार फक्त) रकमेची बँक गॅरंटी घेवून वितरकांची नोंदणी करावी. (ठिबक व तुषार या करीता शुल्क स्वतंत्र भरण्याची आवश्यकता नाही)

२. संबधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व त्यांचे जिल्हातील सुक्ष्म सिंचन वितरक या दोघामधील कृषि आयुक्तालयाने विहित करुन दिलेल्या नमुन्यातील करारनामा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी रु.१००/-च्या स्टँम्प पेपरवर नोटराइज्ड करुन घ्यावा. सदर करारनाम्यामध्ये " कृषि विभागाने सुक्ष्म सिंचन कार्यक्रम राबविण्यासाठी त्यांना आवश्यक असणारे सहकार्य वेळोवेळी मागीतलेली माहिती तसेच बीलांच्या स्वाक्षरीत छायांकीत प्रती वितरकाने विहीत मुदतीत दिल्या नाहीत तर त्यांची सन २०१५-१६ साठीची नोंदणी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडून रद्द करण्यात येईल तसेच पुढील आर्थिक वर्षात त्यांची नोंदणी / नुतनीकरण करण्यात येणार नाही " या अटीचा नव्याने अंतर्भाव करावा.

३.नोंदणीकृत कंपनीच्या जिल्हयातील विक्रिपश्चात सेवा केंद्राची तपासणी सन २०१४-१५ मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील परिशिष्ट १४ प्रमाणे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी स्वतः किंवा त्यांचे अधिनस्त असलेल्या गट-अ अथवा गट-ब मधील अधिकाऱ्यांमार्फत कंपनीची कृषि आयुक्तालय स्तरावरुन नोंदणी झाल्यापासून एक महिन्याच्या आत तपासणी करुन त्यास मान्यता द्यावी.

४. वितरकाने विहित नमुन्यात साठा नोंदवही ठेवणेबाबत विहित प्रपत्र व त्याबाबतचे आदेश जिल्हास्तरावरुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी निर्गमित करावेत.

५. सन २०१५-१६ मध्ये सुक्ष्म सिंचन योजना संपुर्णपणे ई-ठिबक प्रणालीद्वारे राबविण्यात येणार आहे. योजनेच्या अंमलबजावणीत कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत याची दक्षता कंपन्या त्यांचे वितरक/विक्रेते तसेच कृषि विभागाच्या अधिकारी/कर्मचा-यांनी घेणे आवश्यक आहे.

**संचालक फलोत्पादन**

कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५.